महाराष्ट्र शासन

# जाहिरात

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
अधिनस्त असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील
प्राध्यापक (गट-अ), सहयोगी प्राध्यापक (गट-अ) आणि सहाय्यक प्राध्यापक (गट-ब)
रिक्त पदे भरण्याकरीताची जाहिरात

जाहिरात क्र.०१/२०२०
दिनांक: १०.०२.२०२०

१. महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिनस्थ असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमधील प्राध्यापक (गट-अ), सहयोगी प्राध्यापक (गट-अ) आणि सहाय्यक प्राध्यापक (गट-ब) ही राजपत्रित पदे महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक-एलईसी-१४१४/प्र.क्र. १५८/वैसेवा-३, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई ४०० ००१. दि.१५ जुलै २०१४ अन्वये स्वतंत्र निवड मंडळामार्फत भरण्याचा निर्णय घेतलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार या नियमित पदांसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदांसाठी खाली नमुद केलेल्या अटी व अर्हतांची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करु शकतात.

२.उपलब्ध पदे व पदसंख्याः-

२.१ पद - प्राध्यापक

| अ.क्र | विषय | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | मज्जातंतुशास्त्र (Neurology) | १ |
| २ | हृदयवाहिका आणि उरोविकृती शल्यचिकित्साशास्त्र (CVTS) | १ |
| ३ | बालरोगशल्यचिकीत्साशास्त्र (Pediatric Surgery) | १ |
| ४ | अंतःस्त्रावीविकारशास्त्र (Endocrinology) | १ |
| ५ | मुत्रशल्यचिकीत्साशास्त्र (Urology) | १ |
| ६ | वृक्कविकारशास्त्र (Nephrology) | १ |
| ७ | हृदयरोगचिकीत्साशास्त्र (Cardiology) | १ |
| | एकूण पदे | ७ |

२.२ पद - सहयोगी प्राध्यापक

| अ.क्र | विषय | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | हृदयवाहिका आणि उरोविकृती शल्यचिकित्साशास्त्र (CVTS) | २ |
| २ | मज्जतंतुशल्यचिकीत्साशास्त्र (Neurosurgery) | १ |
| ३ | बालरोगशल्यचिकीत्साशास्त्र (Pediatric Surgery) | १ |
| ४ | जठरांत्रजन्यशास्त्र (Gastroenterology) | २ |
| ५ | अंतःस्त्रावीविकारशास्त्र (Endocrinology) | १ |
| ६ | वृक्कविकारशास्त्र (Nephrology) | २ |
| ७ | हृदयरोगचिकीत्साशास्त्र (Cardiology) | २ |
| | एकूण पदे | ११ |

२.३ पद - सहाय्यक प्राध्यापक

| अ.क्र | विषय | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | मज्जातंतुशास्त्र (Neurology) | २ |
| २ | हृदयवाहिका आणि उरोविकृती शल्यचिकित्साशास्त्र (CVTS) | ८ |
| ३ | मज्जतंतुशल्यचिकीत्साशास्त्र (Neurosurgery) | ७ |
| ४ | बालरोगशल्यचिकीत्साशास्त्र (Pediatric Surgery) | २ |
| ५ | जठरांत्रजन्यशास्त्र (Gastroenterology) | ३ |
| ६ | अंतःस्त्रावीविकारशास्त्र (Endocrinology) | २ |
| ७ | मुत्रशल्यचिकीत्साशास्त्र (Urology) | ४ |
| ८ | नवजात शिशुरोगशास्त्र (Neonatology) | १ |
| ९ | वृक्कविकारशास्त्र (Nephrology) | ५ |
| १० | हृदयरोगचिकीत्साशास्त्र (Cardiology) | ९ |
| ११ | सुघटनशल्यचिकीत्साशास्त्र (Plastic Surgery) | २ |
| | एकूण पदे | ४५ |

टीप- शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक आरक्यूएन-१११८/प्र.क्र.१५/वैसेवा-३, दिनांक २९.५.२०१९ अन्वये या पदांसाठी सामाजिक व समांतर आरक्षण लागू नाही.

३. वेतनश्रेणी : प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक यांना दि.१३.०९.२०१९ रोजीच्या शासन निर्णय क्र.पे.२०१९ /सीआर/०३/१९/वैसेवा-२/२०१९ या प्रमाणे वेतन लागू राहील

४. पात्रता :

४.१ उमेदवार हा भारतीय नागरिक असावा.

४.२ प्राध्यापक पदासाठी वय - दि. १ फेब्रुवारी २०२० रोजी उमेदवारांचे वय ५० वर्षापेक्षा जास्त नसावे

सहयोगी प्राध्यापक पदासाठी वय - दि. १ फेब्रुवारी २०२० रोजी उमेदवारांचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे

सहाय्यक प्राध्यापक पदासाठी वय - दि. १ फेब्रुवारी २०२० रोजी उमेदवारांचे वय ४० वर्षापेक्षा जास्त नसावे

४.३ महाराष्ट्र शासनाच्या सेवेत कार्यरत असणाऱ्या उमेदवारांना सहयोगी प्राध्यापक पदासाठी वयोमर्यादा १० वर्षापर्यंत आणि प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक पदासाठी ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

४.४ अपवादात्मक शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी निवड मंडळाकडून विचार करण्यात येईल. परंतु निवड मंडळाच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल. अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरीता विचारात घेतले जातील.

४.५ शैक्षणिक अर्हता - भारतीय आयुर्विज्ञान परिषदचे (एम.सी.आय) चे राजपत्र क्र सं.भा.आ.प.१२(२)/२०१९-मेड. विविध/१२२५२७, दि. ७ जून २०१९ प्रमाणे राहील.

४.६ सर्व पदांकरीता भारतीय आयुर्विज्ञान परिषद (एम.सी.आय) नियमांनुसार असलेला अनुभव विचारात घेतला जाईल.

४.७ शैक्षणिक अर्हता व अनूभव :-

**Super Speciality (DM/M.Ch./DNB)**

| Posts | Academic Qualification | Teaching & Research Experience |
|---|---|---|
| Professor/Addl. Professor (5 years of Post Super Speciality experience) | A Super speciality post graduate qualification in DM/M.Ch./Super Speciality DNB in the concerned subject in concerned subject as per notification dated 1.11.2018 Regulations<br>OR<br>MD/MS/Broad speciality DNB in concerned subject as per notification dated 01-11-2018 with two years Special Training in respective Super Speciality department in a teaching Institution.<br>OR<br>MD/MS/Broad speciality DNB in concerned subject as per notification dated 01-11-2018 with three years work experience in respective Super Speciality Unit/ Department in a teaching Institution with the following conditions :-<br>a. work experience is duly certified by the Head of Unit and/or Department, and endorsed by Director/Dean/Principal.<br>b. Such faculty member must have devoted at least 2/3rd time in such super-speciality during last 3 years (Teaching, Clinical and Research work duly certified by the Head of Unit and/or Department and endorsed by Director/Dean/Principal.<br>c. Documentary proof of contribution to teaching, research, clinical services/ public health etc. in concerned super speciality. | Associate Professor in the subject for 3 years in a permitted/approved/recognized medical college/institution with 4 Research Publications in Indexed Journal on cumulative basis with minimum of 2 Research Publications during the tenure of Associate Professor as Ist Author or as corresponding author. |
| Associate Professor / (2 years of Post Super Speciality experience) | -do- | As Assistant Professor in the subject for two years in a permitted /approved /recognized medical college/ Institution with 2 research publications in Indexed Journals as Ist Author or as corresponding author. |
| Assistant Professor | -do - | |

टीप - प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक या पदासाठी आवश्यक असणाऱ्या अनुभव कालावधीची परिगणना जाहिरात प्रसिध्द होण्याच्या दिनांकापर्यंत करण्यात येईल.

५. प्रस्तुत जाहिरातीमध्ये किमान आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव नमूद केलेला आहे. केवळ सदर अर्हता धारण केली आहे म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलावण्याकरीता पात्र असेलच असे नाही. जाहीरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या आवश्यकतेपेक्षा जास्त असल्यास शैक्षणिक अर्हता आणि अनुभव यांच्या आधारे निकष निश्चित करुन मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या १ पदा करीता ५ उमेदवार अशी निवड मंडळाच्या नियमानुसार मर्यादित करण्यात येईल.

६. कर्तव्ये व जबाबदाऱ्या : प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यायांबाबतचा तपशिल मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई आणि मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे.

७. शुल्क :- रु ५२४/-

८. अर्ज करण्याची पध्दत :

८.१ अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारला जाणार नाही.

८.२ पात्र उमेदवारांनी www.maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर दि.१०.०२.२०२० ते दि.२.०३.२०२० या कालावधीमध्ये ऑनलाईन (Web-based) पध्दतीने अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

८.३ अर्ज भरण्याच्या प्रक्रीयेची सविस्तर माहिती www.maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

८.४ शुल्क भरण्याची पध्दत :- उमेदवाराने विहित पध्दतीने अर्ज सादर केल्यानंतर ऑनलाईन पध्दतीने शुल्क भरण्याकरीताची मुदत दिनांक .०२.०३.२०२० रोजी रात्री १२.०० पर्यंत राहील किंवा उमेदवाराने विहित पध्दतीने अर्ज सादर करुन चलनाव्दारे स्टेट बॅक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत दिनांक ०४.०३.२०२० पर्यंत शुल्क भरणे आवश्यक आहे. सदर निर्धारित दिनांकानंतर कोणत्याही पध्दतीने शुल्क स्विकारले जाणार नाही तसेच कोणत्याही परिस्थितीत भरणा केलेले शुल्क परत केले जाणार नाही.

८.५ विहित मुदतीत शुल्क भरणा केलेल्या उमेदवारांचे अर्ज हे पुढील प्रक्रियेस विचारात घेतले जातील.

८.६ प्राप्त अर्जांपैकी निवड मंडळाच्या कार्यपध्दतीनुसार उमेदवारांना कागदपत्र पडताळणीसाठी बोलविण्यात येईल. कागदपत्र पडताळणीकरीता बोलविलेल्या उमेदवारांची यादी ही www.maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवाराची कागदपत्र पडताळणी झाली म्हणजे त्या उमेदवाराला मुलाखतीस बोलाविले जाईलच असे नाही. कागदपत्र पडताळणी नंतर १ पदास ५ या प्रमाणात पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच मुलाखतीकरीता बोलविले जाईल.

८.७ मुलाखतींचा तपशिलवार कार्यक्रम www.maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. मुलाखतीबाबत उमेदवारास कोणत्याही पत्रव्यवहाराव्दारे कळविले जाणार नाही.

८.८ उमेदवाराने निर्धारित दिनांक, वेळ व ठिकाणानुसार स्वखर्चाने मुलाखतीस उपस्थित राहणे आवश्यक आहे.

८.९ मुलाखतीच्या वेळी उमेदवाराने सर्व आवश्यक मुळ कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. मुळ कागदपत्रे सादर करु शकत नसलेल्या उमेदवारांची मुलाखत घेतली जाणार नाही.

८.१० मुलाखतीच्या वेळी उमेदवाराकडे स्वतःची ओळख पटविण्यासाठी आधार कार्ड/वाहनचालन परवाना/पॅन कार्ड किंवा शासन मान्य ओळखपत्र आवश्यक आहे. शासकीय कर्मचारी त्यांचे कार्यालयीन ओळखपत्र देखील सादर करु शकतात.

८.११ मुलाखतीच्यावेळी उमेदवाराकडे मोबाईलफोन अथवा तत्सम इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने असू नयेत.

८.१२ उमेदवाराने चुकीची किंवा असत्य माहिती सादर केल्याचे निदर्शनास आल्यास त्यास निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविले जाईल.

८.१३ सदर निवडप्रक्रियेचा निर्धारित कार्यक्रम, पदसंख्या इत्यादीमध्ये सुधारणा/बदल/रद्द करण्याचा हक्क शासन राखून ठेवत आहे.

८.१४ सदर निवड प्रक्रियेबाबत, जाहिरातीबाबत काही शंका, अडचणी असल्यास सदस्य सचिव – निवड मंडळयांच्या कार्यालयास दुरध्वनी क्र. ०२०-२६१०२३०० / २३०१ वर कार्यालयीन वेळेत अथवा nivadmandal2017@gmail.com वर ई-मेल व्दारा संपर्क साधावा.

सदस्य सचिव
निवड मंडळ
वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग
मंत्रालय, मुंबई

ठिकाण : मुंबई

दिनांक :